जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/7603
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :-26/१२/२०१७

प्रति,

संस्थाचालक/प्राचार्य,
सर्व शासनमान्य वाणिज्य टंकलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

**विषय:- शासकीय वाणिज्य टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC ) जुन - २०१८**
विद्यार्थ्यांची ऑनलाईन (ONLINE) नोंदणी करणेबाबत..
(नियमित मॅन्युअल टायपिंग व लघुलेखन परीक्षा)

**संदर्भ**:- शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३६/एसडी-२,दि १६ नोव्हेंबर २०१७.

संदर्भीय शासननिर्णयाच्या शुध्दीपत्रकानुसार विद्यमान टंकलेखन अभ्यासक्रमास चार सत्र (२ वर्षे) मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार जानेवारी-२०१८ ते जुन-२०१८ या मॅन्युअल टंकलेखनाच्या सत्रासाठी आपल्या संस्थेतून नियमित परीक्षार्थी म्हणून प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने करणे आवश्यक आहे.

नुतनीकरण केलेल्या संस्थानीच या सत्रासाठी विद्यार्थ्यांना दि.१५ जानेवारी २०१८ अखेरपर्यंत प्रवेश द्यावा. प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या जनरल रजिस्टरमध्ये अचूकपणे करणे आवश्यक आहे. जनरल रजिस्टरमध्ये नोंद केलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने Login द्वारे करण्यासाठी संस्थांना परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर लवकरच लिंक देण्यात येईल. जनरल रजिस्टरसह, हजेरीपत्रक, पावतीपुस्तके व अन्य अनुषंगिक अभिलेख दि. १५ फेब्रुवारी २०१८ अखेरपर्यंत संस्थांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सर्व/ शिक्षण निरीक्षक, मुंबई (उ/द/प) यांचेकडून तपासून घ्यावेत. मॅन्युअल टंकलेखन व संगणक टंकलेखनाचे अभिलेख स्वतंत्र असावेत.

तसेच लघुलेखनाच्या सर्व २४ गती विषयांची परीक्षाही मॅन्युअल टंकलेखन परीक्षेबरोबर घेण्यात येईल. लघुलेखन परीक्षेसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचीही नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे अनिवार्य आहे. सर्व संस्थाचालकांनी परीक्षार्थ्यांची नोंदणी करताना प्रति विद्यार्थी रु. १०० /- परिषदेच्या खात्यावर जमा करुन नोंदणी करावी. त्याच बरोबर विद्यार्थी क्षमतेबरोबर नुतनीकरणाचा प्रस्ताव संस्थाचालकांनी सादर करावा. तसेच जिल्हयाबाहेरील विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेत प्रवेश देण्यात येवू नये.नोंदणी करताना विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अपलोड (upload) करावे.

टंकलेखन व लघुलेखन अभ्यासक्रमास प्रवेश देतांना यानुसार संस्थांनी तंतोतंत कार्यवाही करावी. या सत्राची मॅन्युअल टंकलेखन व लघुलेखन परीक्षा जुन-२०१८ च्या शेवटच्या आठवडयात घेण्यात येईल, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

प्रत :-

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) शिक्षणाधिकारी (माध्य) ,जि.प.सर्व.
३) शिक्षण निरीक्षक,मुंबई (उ/द/प)

Jan-17/LETTER